सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ:-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र.३६३/ मासैक,दि. १५/१२/२०२५

**विषय:-** राज्यातील आजी / माजी सैनिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी तालुका स्तरावरील समिती पुर्नगठीत करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र.३६३/मासैक, दि.१५/१२/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१२१५१७२९०८९००७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 16-12-2025 15:48:07

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/
नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके),
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात

**राज्यातील आजी / माजी सैनिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी तालुका स्तरावरील समिती पुर्नगठीत करणेबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक:- संकीर्ण-२०२५/प्र.क्र.३६३/मासैक**
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दिनांक : १५ डिसेंबर, २०२५

**वाचा**:- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक-सैकवि- १०९९/२८८/प्र.क्र. ४०/९९/२८, दिनांक १६ जानेवारी २००१.
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र.कार्यशा: २०२५/प्र.क्र.०६/म-८, दिनांक ०९ एप्रिल, २०२५.
३) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने केलेल्या शिफारशी दिनांक ९ एप्रिल, २०२५.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्राचा अधिवासी असलेल्या आजी / माजी सैनिकांना राज्य शासनामार्फत त्यांच्या पुनर्वसनासाठी व विविध कल्याणकारी सवलती देण्यासाठी संदर्भीय क्र.१ येथील दिनांक १६ जानेवारी, २००१ रोजीच्या शासन निर्णयान्वये तालुका स्तरावर समिती गठीत करण्यात आली आहे.

२. महसूल व वन विभागामार्फत विविध प्रशासकीय विभागाच्या माध्यमातून क्षेत्रीय स्तरावर हाताळत येणाऱ्या विविध विषयाच्या अनुषंगाने प्रशासनाच्या विविध स्तरावरील विद्यमान कार्यपध्दती, योजनांची प्रभावितता, कामकाजातील कार्यक्षमतेचे मुल्यांकन, माहिती व्यवस्थापन प्रणाली इ. चा सखोल अभ्यास करुन सुधारीत उपाययोजना व शिफारशी करण्याकरिता संदर्भीय क्र.२ येथील दिनांक ०९.०४.२०२५ अन्वये समिती गठीत करण्यात आली होती. त्यानुंषगाने विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग यांच्या अध्यक्षतेखालील गठीत समितीने केलेल्या शिफारशीनुसार राज्यातील आजी / माजी सैनिकांच्या जमीनीविषयक व इतर अनुषंगीक प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी तसेच तालुकास्तरावर समन्वय करण्यासाठी समितीची पुनर्रचना करण्याची बाब विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील आजी / माजी सैनिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी तालुका स्तरावरील समितीची पुढीलप्रमाणे पुनर्रचना करण्यात येत आहे.

१) उपविभागीय महसूल अधिकारी -- अध्यक्ष
२) गटविकास अधिकारी -- सदस्य
३) उप विभागीय पोलीस अधिक्षक पोलीस उपअधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त -- सदस्य
४) उपअधीक्षक, भूमी अभिलेख -- सदस्य
५) दोन प्रतिष्ठित नागरिक (जिल्हाधिकारी यांचेद्वारे नामनिर्देशित) -- सदस्य
६) दोन माजी सैनिक (जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचेद्वारे नामनिर्देशित) -- सदस्य
७) संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी -- सदस्य सचिव

३. जिल्ह्यातील जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका पातळीवरील जिल्ह्यातील आजी / माजी सैनिकांचे विविध प्रश्न / अडचणी सोडविण्यासाठी वरील समितीची बैठक जिल्ह्यातील प्रत्येक तालुका स्तरावर दर सहा महिन्यांनी आयोजित करुन त्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाचा व प्रलंबित प्रकरणावर केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांना पाठवावा. संचालक, सैनिक कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अशा प्राप्त होणाऱ्या अहवालाची छाननी करुन त्या अहवालांची एकत्रित माहिती शासनाला अवलोकनार्थ पाठवावी.

४. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल:-

१) माजी सैनिकांच्या / विधवांच्या विविध कल्याणकारी योजनांची / प्रशिक्षण कार्यक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेणे.

२) राज्य शासनाकडून माजी सैनिक/ विधवांना मिळाणाऱ्या आर्थिक सहाय्यासंदर्भातील विविध समस्यांचे निराकरण करणे.

३) माजी सैनिक, शौर्यपदक धारक, त्यांच्या विधवा यांची जमीनीबाबतची प्रकरणे, जमिनीच्या अतिक्रमणाची प्रकरणे त्वरेने निकालात काढण्यासाठी उपाययोजना करणे.

४) युध्द विधवा / शौर्यपदक धारक माजी सैनिकांचा सन्मान करणे.

५) राज्य शासनाच्या विविध उपक्रमात माजी सैनिकांना सहभागी होण्यास प्रोत्साहित करणे.

६) माजी सैनिकांच्या निवृत्तीवेतनाची प्रकरणे त्वरेने निकालात काढणे.

७) माजी सैनिक व त्यांचे कुटुंबिय यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत तात्काळ कार्यवाही करणे.

८) सैन्यदलात नविन तरुण भरती होण्याच्या दृष्टीने पोषक वातावरण तयार करणे.

५. समिती सदस्य व माजी सैनिक व वा त्यांचे कुटुंबीय यांना यथास्थिती दूरदृष्य प्रणालीद्वारे (V.C.) उपस्थिती राहण्याची व्यवस्था करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१२१५१७२९०८९००७ असा आहे. हे शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by GANESH NIVRUTTI PAWAR
Date: 2025.12.15 17:30:33 +05'30'

**(गणेश पवार)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन)यांचे सचिव,
४. मा.उपमुख्यमंत्री (न.वि.वि.)यांचे सचिव,

५. मा. अध्यक्ष महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
६. मा. मंत्री, माजी सैनिकांचे कल्याण यांचे खाजगी सचिव,
७. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
८. मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक,
९. सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव,
१०.सचिव (मासैक) यांचे स्विय सहाय्यक,
११.सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
१२.सर्व विभागीय आयुक्त,
१३.सर्व जिल्हाधिकारी,
१४.उप विभागीय पोलीस अधिक्षक पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त,
१५.सर्व उपविभागीय महसूल अधिकारी,
१६.सर्व उपअधीक्षक, भूमी अभिलेख,
१७.संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे.
१८. सर्व गटविकास अधिकारी,
१९.सर्व जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी,
२०.दोन प्रतिष्ठित नागरिक (जिल्हाधिकारी यांच्याद्वारे नामनिर्देशित ),
२१.दोन माजी सैनिक (जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांच्याद्वारे नामनिर्देशित),
२२.सर्व मंत्रालयीन विभाग / मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय प्रमुख,
२३.निवडनस्ती (२ प्रती).